# महाराष्ट्र शासन

## पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अंबड रोड, जालना - 431 203

दुरध्वनी नं.02482-225601,फॅक्स.02482-225352 ईमेल-sp.jalna@mahapolice.gov.in


दि.12/03/2026

# प्रेस नोट

पोलीस अधीक्षक, जालना आस्थापनेवरील पोलीस शिपाई (156) पदे भरणेकरीता पोलीस शिपाई भरती 2024-2025 प्रक्रियेतील शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी दि.11/02/2026 ते 20/02/2026 या कालावधीत पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, सर्व्हे.नं.488, जालना येथे घेण्यात आली. मैदानी चाचणीमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी या घटकाचे संकेतस्थळ www.jalnapolice.gov.in व मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि.02/03/2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांची लेखी परीक्षा (1) पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना, (2) जे.ई.एस.महाविद्यालय, जालना व (3) राष्ट्रीय हिंदी विद्यालय, जालना येथे दि.15/03/2026 रोजी आयोजित करण्यात आली असून त्याचे परीक्षा केंद्रनिहाय प्रवेशपत्र policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

दि.15/03/2026 रोजी घेण्यात येणारी लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याच्या दृष्टीने उमेदवारांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

<u>उमेदवारांसाठी सूचना</u> :-

1. मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र तसेच प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेले पासपोर्ट साईज आकाराचे दोन फोटो असतील तरच उमेदवारास परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येईल.
2. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी तीन तास अगोदर सकाळी 08:00 वा.हजर रहावे.
3. उमेदवारांना काळ्या शाईचे बॉलपेन या कार्यालयाकडून पुरविले जाणार असून परीक्षा केंद्रातील प्रत्येक हॉलमध्ये एक घड्याळ लावण्यात येणार आहे. त्यामुळे सूचना क्र.1 मधील प्रवेशपत्र व पासपोर्ट फोटोव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य (उदा.पेन, पेन्सिल, खोडरबर, मनगटी घड्याळ,इ.) परीक्षा केंद्रावर नेण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.
4. लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शक पद्धतीने व सीसीटीव्ही कॅमेरे तसेच व्हिडीओ कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली होणार असून उमेदवारांच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रात भ्रमनध्वनी(मोबाईल)/डिजिटल डायरी/ मायक्रोफोन/मायक्रो कॅमेरा डिव्हाईस/कॅल्क्युलेटर/डिजिटल नोट पॅड/नोट्स पुस्तके/ईअरफोन/हिअरींग एड डिव्हाईस/स्मार्ट वॉचेस/स्मार्ट आय ग्लासेस, इ. तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करीत असल्याचे आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
5. लेखी परीक्षेच्या आदल्या दिवशी दि.14/03/2026 रोजी बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांची राहण्याची व्यवस्था शोभा प्रकाश मंगल कार्यालय, पोलीस कॉम्प्लेक्सजवळ, बस स्टँड रोड, जालना येथे करण्यात आली आहे.
6. परीक्षेच्या दिवशी दि.15/03/2026 रोजी सकाळी 07:00 ते 09:00 या कालावधीत बस स्टँड/रेल्वे स्टेशन येथून परीक्षा केंद्रावर जाण्याकरीता वाहनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

( अजय कुमार बंसल )
पोलीस अधीक्षक, जालना